INSTITUTE OF PHARMACY
THE MET LEAGUE OF COLLEGES
MET Bhujbal Knowledge City
AS SHARP AS YOU CAN GET
Social Welfare Cell

**"उज्ज्वल भवितव्यासाठी उत्तम चारित्र्य गरजेचे " पोलीस आयक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे भुजबळ नॉलेज सिटी येथे प्रतिपादन.**

मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव येथील सोशल वेल्फेअर सेल यांच्या तर्फे दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयीन जीवनातील सामाजिक बांधिलकी आणि महिला सुरक्षा या विषयावर व्याख्यान आयोजीत करणय आले होते.

भुजबळ नॉलेज सिटीच्या संचालिका डॉ. सौ शेफाली भुजबळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, डॉ. विजयकुमार वाणी, डॉ. निलेश बेरड, डॉ. वानखेडे, आडगाव पोलीस स्टेशन येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. केशव मोरे पोलीस महिला कक्षाच्या प्रमुख सौ. भावना महाजन, सौ. हर्षाराणी देवरे, महाविद्यालयातील कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. वाणी यांनी श्री. पाटील यांचे स्वागत केले तसेच डॉ. सौ शेफाली भुजबळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुंबई एजुकेशन ट्रस्ट, भुजबळ नॉलेज सिटी संचलित मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये सोशल वेल्फेअर सेल यांच्यामाध्यमातून सदर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयीन जीवनातील सामाजिक बांधिलकी आणि महिला सुरक्षा या विषयी मार्गदर्शन करतांना श्री. विश्वास नांगरे-पाटील यांनी विद्यार्थ्यांचे विविध मुद्द्यांवर लक्ष वेधले.

विद्यार्थ्यांना संबोधित करतांना हृदयामध्ये करुणा असणारा, मनगटामध्ये बळ असणारा, स्वतःवर विश्वास असणारा, जो निर्भय आहे आणि मुख्य म्हणजे ज्याचे चारित्र्य शुद्ध आहे आणि देशावर प्रेम आहे असा स्वामी विवेकानंद यांना अभिप्रेत असलेला तरुण आज देशाला हवा आहे आणि हे उद्दिष्ठ समोर ठेवून आजच्या महाविद्यालयीन तरुणांनी मार्गक्रमण केले पाहिजे असा सल्ला यावेळी श्री. पाटील यांनी दिला.

आयुष्यात यश प्राप्तीसाठी आणि कुठलेही उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी सामाजिक बांधिलकीची जाणीव असणे हे सुद्धा आवश्यक आहे त्या दृष्टीने आपण स्वतः मध्ये बदल घडवून आणणे गरजेचे आहे.

मुली आणि महिलांचा सन्मान राखणे हे सामाजिक कर्तव्य आहे

मुली आणि महिलांना संबोधित करतांना श्री. नांगरे पाटील यांनी शिक्षण, स्वावलंबन, स्वसंरक्षण आणि सावधानता यांचे महत्व विषद केले. सामाजिक अत्याचारापासून बचाव करण्यासाठी महिला आणि मुलींनी स्वताचे अस्तित्व वृद्धिंगत केले पाहिजे असा सल्ला यावेळी श्री. पाटील यांनी दिला. नाशिक पोलिसांच्या निर्भया पथकाविषयी आणि उपलब्ध असलेल्या सुविधांविषयी माहिती उपस्थितांना देण्यात आली.

Summary: Social Welfare Cell of MET'S Institute of Pharmacy organized a guest lecture on the topic **Social Responsibility and Women Safety** by Hon. Vishwasji Nangare-Patil Commissioner of police, Nashik.
Hon. Patil explained the importance of values, respect towards women, social responsibility in today's youth. He guided and motivated the students of MET Institute of Pharmacy. Dr. Wani Welcomed Shri. Patil and Hon. Shefali Bhujbal Felicited CP Nashik.


Hon. Vishwas Nangare Patil


MET'S INSTITUTE OF PHARMACY
सोशल वेलफेअर सेल
SOCIAL WELFARE CELL
MET Bhujbal Knowledge City
MET
Bhujbal
Knowledge City

